# नाशिक महानगरपालिका, नाशिक

## जाहीर आवाहन

**"मोफत अंत्यसंस्कार योजना"** उपक्रमातंर्गत नाशिक महानगरपालिका परीक्षेत्रातील सर्व धर्मियांकरीता मोफत अंत्यसंस्कार योजना सन २००३ पासून आज पावेतो नाशिक महानगरपालिका राबविणेत येत आहे.

सदर योजन अंतर्गत सर्व धर्मियांना मृताचे अंत्यसंस्काराकरीता मोफत साहित्य उपलब्ध करुन दिले जाते. या उपक्रमातंर्गत मोठया प्रमाणात जळाऊ लाकडाचा वापर होत आहे. ज्यामुळे पर्यावरणाची हानी होऊन जल व वायु प्रदुषणात वाढ होऊन ग्लोबल वॉर्मिंग होत आहे. परीणामी भविष्यातील आपल्याच पिढीवर त्याचे दुष्परीणाम होणार आहे.

पर्यावरण रक्षण करणे ही सर्व नागरीकांची जबाबदारी आहे. याकरीता जळाऊ लाकडाऐवजी पर्यावरणपूरक गौरी, मोक्षकाष्ठ, इंधन विटा, डिझेल दाहिनी, विद्युत दाहिनी, गॅस दाहिनी चा पर्याय आजमितीस नाशिक महानगरपालिकेने मोफत उपलब्ध करुन दिलेला आहे.

पर्यावरण रक्षणाचा हेतू साध्य करणेकामी वृक्षतोड थांबविणे करीता सर्व नागरीकांनी आवाहन करण्यात येते की, पर्यावरणपुरक अंत्यविधी जसे पर्यावरणपूरक गौरी, मोक्षकाष्ठ, इंधन विटा, डिझेल दाहिनी, विद्युत दाहिनी, गॅस दाहिनी या पर्यायांचा वापर करावा.

वरील प्रमाणे, **"पर्यावरणपुरक अंत्यविधी"** व्दारे **अंत्यसंस्कार विधी केल्यास** आपले नाशिक हरीत व पर्यावरण समृध्द होण्यास आपले अमुल्य योगदान लाभेल.

SD/xx

**राधाकृष्ण गमे (भा.प्र.से)**
**आयुक्त**
**नाशिक महानगरपालिका,नाशिक.**